admin16-17

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

MCAER
कृषि परिषद

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)
आयएस्ओ ९००१ : २००८ मानांकित संस्था
१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद २००८-२००९

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com
वेबसाईट : www.mcaer.org
दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.
फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.

जा.क्र. मकृप/शिक्षण-१/१४१६/१४४६ दि. २१ जून,२०१६

## परिपत्रक

**विषयः- कृषी तंत्रनिकेतन अभ्यासक्रमाचा निकाल उशिरा जाहीर केल्यामुळे गुणवत्ता यादीबाहेरील पदविकाधारक उमेदवारांना कृषी पदवी अभ्यासक्रमास प्रवेश देण्याबाबत.**

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत कृषी तंत्रनिकेतन पदविकाधारक उमेदवारांना कृषी पदवी अभ्यासक्रमाच्या थेट दुसऱ्या वर्षात तसेच पहिल्या वर्षात प्रवेश देण्यात येतात. सन २०१६-१७ हया शैक्षणिक वर्षातील सदर प्रवेश प्रक्रिया दि. २ मे,२०१६ पासून सुरु झाली असून याअंतर्गत ऑनलाईन प्रवेश अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक २५ मे,२०१६ होता.

तथापि, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठांतर्गत कृषी तंत्रनिकेतन अभ्यासक्रमाचा निकाल दि. २० मे,२०१६ रोजी जाहीर झाला तसेच गुणपत्रक मिळण्यास विलंब झाला असल्याने उक्त मुदतीत ऑनलाईन प्रवेश अर्ज सादर करू न शकल्याचे दूरध्वनी या कार्यालयास प्राप्त होत आहेत. याचबरोबर काही उमेदवारांनी पुनर्तपासणीकरिता अर्ज सादर केले होते, अशा काही उमेदवारांचे गुण वाढल्यामुळे ते पहिल्या वर्षाच्या प्रवेशाकरिता तसेच थेट दुसऱ्या वर्षाकरिताही पात्र होत आहेत. काही उमेदवारांकडून लेखी स्वरूपात विनंती अर्जही कृषी परिषद कार्यालयास प्राप्त झालेले आहेत.

वरील बाबी विचारात घेता, प्रवेशोच्छुक उमेदवारांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टिकोनातून कृषी तंत्रनिकेतन पदविकाधारक उमेदवारांसाठी कृषी पदवी अभ्यासक्रमास रिक्त असलेल्या जागांवर **खालीलप्रमाणे प्राधान्यक्रम** विचारात घेऊन **दि. १ व २ आणि ४ व ५ जुलै,२०१६ या कालावधीत** प्रवेश माहिती पुस्तिकेतील 'परिशिष्ट आर' येथे नमूद केलेल्या प्रवेश प्रक्रिया केंद्रावर प्रवेश प्रक्रिया राबविण्याचे या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येत आहे.

१. विद्यापीठ / राज्यस्तरीय गुणवत्ता यादीमध्ये समावेश असलेले उमेदवार.

admn16-17

२. 'ऑनलाईन' प्रवेश अर्ज दाखल केलेले परंतु काही कारणास्तव त्यांचा विद्यापीठ / राज्यस्तरीय गुणवत्ता यादीमध्ये समावेश नाही, असे पात्र उमेदवार.

३. 'ऑनलाईन' प्रवेश अर्ज सादर न केलेले पात्र उमेदवार.

कृषी महाविद्यालयांना सूचित करण्यात येते की, गुणवत्ता यादीबाहेरील पात्र उमेदवारांना प्रवेश दिल्यास अशा उमेदवारांची यादी कृषी परिषदेकडे सादर करावी. तसेच प्रती उमेदवार प्रवेश अर्ज शुल्क रू.१०००/- (मागासवर्गीय उमेदवार असल्यास रू.५००/-) याप्रमाणे होणारी रक्कम 'वित्तीय सल्लागार, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे' यांच्या नावे पुणे येथे देय असलेल्या राष्ट्रीयकृत बँकेच्या धनाकर्षाद्वारे कृषी परिषदेकडे जमा करावी.

महासंचालक

प्रति,

१. मा.मंत्री (कृषी) तथा अध्यक्ष, कृषी परिषद यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

२. मा. कुलगुरु / कुलसचिव / अधिष्ठाता (कृषी), महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, जि.अहमदनगर / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ,अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी.

३. मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., शॉप १ व २, राधाकांत को-ऑप हौसिंग सोसायटी, रामबाग कॉलनी, कृष्णा हॉस्पीटलसमोर, पौड रोड, पुणे ४११ ०३८.

२/- त्यांना सूचित करण्यात येते की, पदवी अभ्यासक्रमाच्या वरील प्रवेश कार्यपध्दतीविषयी सर्व कृषी विद्यापीठांतर्गत कृषी महाविद्यालयांना तसेच राज्यस्तरीय प्रवेश गुणवत्ता यादीतील सर्व विद्यार्थ्यांना आणि इतर प्रवेशोच्छुक उमेदवारांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे. तसेच प्रत्येक प्रवेश प्रक्रिया केंद्राच्या 'लॉग इन'मध्ये योग्य त्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात आणि तद्नुसार **संबंधित सर्व प्रवेश प्रक्रिया केंद्र प्रमुख तसेच राज्यस्तरीय गुणवत्ता यादीतील सर्व उमेदवार आणि प्रवेश अर्ज रद्दबातल ठरविण्यात आलेले सर्व उमेदवार यांना ई-मेल / 'एसएमएस'द्वारे कळविण्यात यावे.** तसेच 'रद्दबातल ठरविण्यात आलेल्या प्रवेश अर्जांची यादी' संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावी.

४. मे. जे. डी. आय. एन. सॉफ्ट, ई-१४, वर्ल्ड ऑफ मदर कॉम्प्लेक्स, जय गणेश व्हिजन, आकुर्डी, पुणे ४११ ०३५.

२/- त्यांना सूचित करण्यात येते की, कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर सदर परिपत्रक प्रसिध्द करण्यात यावे.